## SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

**DEULGAON RAJA DIST. BULDANA**

**A RESEARCH PROJECT**

**ON**

# 'JALYUKT SHIWAR ABHIYAN' FOR WATER SCARSITY FREE MAHARASHTRA: A CRITICAL STUDY

**UNDERTAKEN BY:**
**THE DEPARTMENT OF ECONOMICS**
**(WITH THE ACTIVE PARTICIPATION OF STUDENTS)**

**GUIDED BY:**
**DR. DNYANESHWAR V. GORE**
**Associate Profssor & Head,**
**Department of Economics**

**March, 2022**

# प्रास्ताविक

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी विविध मृदू कौशल्ये (Soft Skills) विकसित करण्याच्या दृष्टीकोनातुन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया उपक्रमांचा एक भाग म्हणजे प्रस्तुत विद्यार्थी संशोधन प्रकल्प.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची बीजे रुजविण्याचा उद्देशाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रस्तुत विद्यार्थी संशोधन प्रकल्प (Students' Research Project) साठी "पाणी-टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९' उद्दिष्टपूर्तीसाठी 'जलयुक्त शिवार अभियान': एक चिकित्सक अध्ययन" या विषयाची निवड करून महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांकडून वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय अहवाल इत्यादी माध्यमातून माहिती संकलित करून प्रस्तुत संशोधन प्रकल्प तयार करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून संशोधन कार्यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविल्याबद्दल सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर व्ही. गोरे**
**प्रमुख, अर्थशास्त्र विभाग**

# The List of Students Who have participated in the work of Survey

| Sr. No. | Students name | Class |
|---|---|---|
| 01. | Ajay B. Jadhao | B.A.III |
| 02. | Akash B. Gadekar | B.A.III |
| 03. | Akshay A. Bharti | B.A.III |
| 04. | Anant M. Bankar | B.A.III |
| 05. | Anuja A. Maghade | B.A.III |
| 06. | Anuja A. Maghade | B.A.III |
| 07. | Badrinath P. Sahare | B.A.III |
| 08. | Bhimrao R. Anande | B.A.III |
| 09. | Chaitali K. Nirphale | B.A.III |
| 10. | Ganesh D. Mhaske | B.A.III |
| 11. | Gangaram L. Jadhav | B.A.III |
| 12. | Gaurav A. Salve | B.A.III |
| 13. | Gaurav K. Sapate | B.A.III |
| 14. | Geeta L. Abole | B.A.III |
| 15. | Geeta S. Kawhale | B.A.III |
| 16. | Gopal T. Lad | B.A.III |
| 17. | Jagdish M. Zore | B.A.III |
| 18. | Janardhan J. Pawar | B.A.III |
| 19. | Kiran P. Dure | B.A.III |
| 20. | Madhuri S. Khandare | B.A.III |
| 21. | Mangesh A. Thete | B.A.III |
| 22. | Monika B. Mhaske | B.A.III |
| 23. | Pooja G. Kharat | B.A.III |
| 24. | Pooja L. Shejul | B.A.III |
| 25. | Poonam G. Kharat | B.A.III |
| 26. | Priya G. Zore | B.A.III |
| 27. | Pushpa K. Nikam | B.A.III |
| 28 | Ravi R. Wagh | B.A.III |
| 29. | Rupali T. Shelke | B.A.III |
| 30. | Pooja G. Kharat | B.A.III |

svc.drraja.economics

# 'पाणी-टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९' उद्दिष्टपूर्तीसाठी 'जलयुक्त शिवार अभियान': एक चिकित्सक अध्ययन

## प्रस्तावना :

सन २००४ ते २०१३ या काळात दरवर्षी सरासरी ३,६८५ शेतकऱ्यांच्या आत्महत्या! म्हणजेच दररोज सरासरी १० आत्महत्या... होय! ही परिस्थिती देशातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या राज्याची म्हणजे महाराष्ट्राची !

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही अत्यंत मोठी आणि संवेदनशील अशी समस्या. गेल्या काही वर्षांत दुष्काळ हा जणू महाराष्ट्राच्या पाचवीलाच पुजलेला. विदर्भ, मराठवाडा येथील दुष्काळ परिस्थिती अतिशय दयनीय आहे. अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होतो. या बाबी राज्याच्या विकासात एक आव्हान ठरत आहेत. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धीअभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसून येतो.

अशा वेळेस महाराष्ट्राला या पाणीटंचाईच्या समस्येतून मुक्त करण्यासाठी काही ठोस उपाययोजना करणे गरजेचे होते. यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार अभियान राबवण्याची आणि २०१९ पर्यंत महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याची धाडसी घोषणा घोषित केली. २६ जानेवारी, २०१६ रोजी

मुख्यमंत्री फडणवीसांद्वारे या अभियानाची घोषणा करण्यात आली. याद्वारे २५००० गावांची म्हणजेच दरवर्षी ५००० गावांची पाणीटंचाईतून मुक्तता करण्याचे ध्येय शासनाने ठेवले. वर्ष २०१४-१५ मध्ये भूजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २ हजार २३४ गावे तसेच शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९ हजार ५९ गावांमध्ये हे अभियान प्राधान्याने राबविण्यात येत आहे.राज्य सरकारने सुरू केलेली जलयुक्त शिवार ही महत्वाकांक्षी योजना आहे. पाण्याचा पडणारा थेंब अन् थेंब अडवायचा, साठवायचा व त्याच ठिकाणी मुरवायचा. पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्यासाठी पाण्याचे विकेंद्रित साठे त्या त्या गावात निर्माण करायचे आहेत. राज्यात सगळीकडेच या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे, कृषी क्षेत्राचा विकास सिंचनाशी निगडीत आहे. राज्याची निर्मिती झाल्यापासून गेल्या ५६ वर्षाचा लेखाजोखा केला असता सिंचन क्षेत्राचा विकास समतोल प्रमाणात झालेला नाही. भारतामध्ये जलसाठा विपुल प्रमाणात आहे, परंतु पाण्याच्या राजकारणाने बऱ्याच राज्यामध्ये पाणीप्रश्न गंभीर बनला. देशात स्वातंत्र्यानंतर राज्याराज्यात सिंचनक्षेत्रात जी गुंतवणूक केली गेली आहे. त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. परंतु महाराष्ट्र १७.५ टक्के वर सिंचनक्षेत्र गेले नाही. देश पातळीवरील हे प्रमाण ४३ टक्के एवढे आहे.

**महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर** सन **१९६५,** सन **१९६६,** सन **१९७२,** सन **१९७९,** सन **२००२,** सन **२००९,** सन **२०१४,** सन **२०१५ आणि** सन **२०१६ या वर्षात महाराष्ट्राला भीषण अशा दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. राज्यात वेळोवेळी पडलेल्या दुष्काळाचा विचार करून, आणि त्यावर कायम स्वरूपी शाश्वत उपाय सुचविण्यासाठी दीर्घकालीन शेतकर्यांना सुखावणारी योजना म्हणजे जलयुक्त शिवार योजना होय.**

## जलयुक्त शिवार अभियानाची आवश्यकता :

**सन २०१४ - १५ या काळात राज्यात पर्जन्यमानात सरासरी २० टक्के पेक्षा जास्त असलेले १८४ तालुके आहेत. भूजल पातळी ३ मीटरपेक्षा जास्त घट झालेले ७२ तालुके आहेत. २ ते ३ मीटर पेक्षा जास्त घट झालेले ११६ व १ ते २ मीटरपेक्षा जास्त घट झालेले १९० तालुके आहेत, म्हणजेच भूगर्भातील पाणी पातळी २ मीटरपेक्षा जास्त आहे. संबंधित गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासण्याची शक्यता शासनाने दि. २५ नोव्हेंबर २०१४ या शासन निर्णयान्वये २२ जिल्ह्यातील १९०५९ गावांमध्ये टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर केली, तसेच राज्याच्या प्रकल्पातील पाणी साठा मर्यादित आहे. मराठवाड्यात त्याचे प्रमाण १० टक्के पर्यंत होते. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेतकर्यांच्या वाढत्या आत्महत्या, कृषी क्षेत्राचे नाकारात्मक विकासदर, जनावरांचा चारा प्रश्न, वाढते स्थलांतर,**

उद्योगधंद्याची वाताहात, शेतीवर आधारित असून उद्योगधंद्याचा प्रश्न, वाढती बेकारी आदी प्रश्नांवर मात करण्यासाठी जलसिंचन हा उत्कृष्ट पर्याय पुढे येतो. या विचाराची कास धरून शासनाने सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र - २०१९ हा उपक्रम हाती घेतला. पाण्यावर कायम स्वरूपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करून २०१५ रोजी जलयुक्त शिवार अभियानाची सुरूवात केली. हा उपक्रम केंद्र व राज्य सरकारच्या जलसंधारण व कृषी विभागाच्या वतीने हाती घेण्यात आला आहे.

## अभियानाचे उद्देश्य :

महाराष्ट्र राज्यात सतत उद्भवणारी टंचाई परिस्थिती विचारात घेवून सर्वांसाठी 'पाणी - टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९' अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियानामध्ये शेततळे निर्माण करणे, नद्यांची खोली व रुंदी वाढविणे, पावसाचे पाणी अडवून साठवणूक, धरणबांधणी, छोट्या तळ्यांची निर्मिती अशा पद्धती वापरून जल संधारणाची कामे तसेच लहान पाण्याचे प्रवाह मोठ्या प्रवाहासोबत जोडणे अशी कामे याअंतर्गत सुरु आहेत. कमी खर्चात, मुबलक पाणी उपलब्ध करून देणे असे धोरण यामागे आहे. जलयुक्त शिवार अभियानाचे मुख्य उद्देश्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात:

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.

२. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.

३. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेती साठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.

४. राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती व ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनरूज्जीवीकरण करून पाणी पुरवठ्यात वाढ करणे.

५. भूजल अधिनियम अंमलबजावणी.

६. विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे.

७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.

८. अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्त्रोतांची (बंधारे / गाव तलाव / पाझर तलाव / सिमेंट बंधारे) पाणी साठवण क्षमता पुर्नस्थापन करणे / वाढविणे.

९. अस्तित्वातील जलस्त्रोतांमधील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणी साठा वाढविणे.

१०. वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देवून वृक्ष लागवड करणे.

११. पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव /जागृती निर्माण करणे.

१२. शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यास प्रोत्साहन / जलजागृती करणे.

१३. पाणी अडविणे / जिरवणे बाबत लोकसहभाग वाढविणे.

## अभियानाची व्याप्ती :

सदर कार्यक्रम अभियान स्वरूपात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजक यांच्याकडील उपलब्ध निधीतून राज्यातील टंचाई सृष्य तालुक्यात व उर्वरित भागात भविष्यात टंचाई भासू नये यासाठी राबविण्यात येत आहे. यासाठी विभागीय समन्वय समिती, जिल्हास्तरीय समिती व तालुका स्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

## अभियानांतर्गत घ्यावयाची कामे :

जलयुक्त शिवार अभियानात खालील कामे घ्यावीत. तपशील खालील प्रमाणे आहे.

१. पाणलोट विकासाची कामे.
२. साखळी सिमेंट काँक्रीट नाला बंधार्याची कामे नाला खोलीकरण /रूंदीकरण करणे.
३. जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे.
४. अस्तित्वातील लघुपाटबंधारे संरचनांची (केटी वेअर / साठवण बंधारे) दुरूस्ती करणे.
५. पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरूस्ती, नुतनीकरण व क्षमता पुनर्स्थापित करणे.

६. पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव / शिवकालीन / ब्रिटीशकालीन / निजामकालीन तलाव / माती नालाबांधातील गाळ काढणे.

७. मध्यम व मोठ्या प्रकल्पांची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाय योजना करणे.

८. छोटे ओढे / नाले जोड प्रकल्प राबविणे.

९. विहीर / बोअर वेल पुनर्भरण कामे.

१०. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर.

११. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे.

१२. पाणी वापर संस्था बळकट करणे.

१३. कालवा दुरूस्त करणे.

## अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्यांना पुरस्कार :

- तालुकास्तरावर दोन
- जिल्हास्तरावर दोन
- विभागीय स्तरावर दोन
- राज्य स्तरावर तीन तालुके
- प्रभावी जनजागृती आणि प्रसिद्धीविषयक उत्कृष्ट लेखन करणाऱ्या पत्रकारांसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर प्रत्येकी तीन पारितोषिके

## मूल्यमापन कार्यपद्धती :

जलयुक्त शिवार अभियानाला गती येण्यासाठी आणि अपेक्षित परिणामकारकता साधण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ‘शक्ती प्रदत्त समिती’ गठीत केली आहे. एकंदरीतच या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करुन दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारत असताना, या अभियानांतर्गत साकारल्या जाणाऱ्या कामांची अंमलबजावणी पारदर्शकपणे करताना कामांची गुणवत्ता राखण्यासाठीही शासन दक्ष आहे.

मूल्यमापन कार्यपद्धती जलयुक्त शिवार अभियानांतर्गत होणाऱ्या कामांचा दर्जा चांगला व गुणवत्तापूर्ण असावा यासाठी शासनाने 13 मार्च रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे निश्चित अशी मूल्यमापन-कार्यपद्धती ठरवून दिली आहे. त्यानुसार जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत होणाऱ्या कामांचे समवर्ती मूल्यमापन केले जाणार आहे.

म्हणजे रोजगार हमी विभागाच्या कामांचे जसे प्रत्यक्ष काम सुरु असताना गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांमार्फत मूल्यमापन होते; त्याप्रमाणे किमान दोन वेळा कामांचे समवर्ती मूल्यमापन केले जाईल. काम पूर्ण झाल्यानंतर झालेल्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करण्यात येईल. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत ज्याप्रमाणे मूल्यमापन होते, त्याप्रमाणे ही

कार्यपद्धती असेल. म्हणजेच काम सुरु असताना आणि काम झाल्यावरही कामाच्या गुणवत्तेचे प्रभावी मूल्यमापन करण्यावर शासनाने भर दिला आहे.

## अक्षांश-रेखांशासह संकेतस्थळावर सचित्र माहिती :

कामाचे स्थळ निश्चित रहावे यासाठी काम सुरु होण्यापूर्वी, सुरु असताना आणि पूर्ण झाल्यानंतर कामाच्या स्थळाचा अक्षांश-रेखांश अंकित असलेला डिजीटल फोटो काढण्यात येतील. ते संकेतस्थळांवर जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करुन दिले जातील.यामुळे ग्रामस्थांनी सुचविलेले स्थळ, कामाचे स्थळ याबाबत नेमकेपणा अधोरेखित करता येईल. अक्षांश-रेखांश अंकनामुळे स्थळ पुनरावृत्तीची शक्यता पूर्णतः मावळली आहे. कामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी आहे. तसेच ही माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावयाची असल्याने कामातील पारदर्शकता राखण्यासही मदत होणार आहे.

## ग्रामपंचायत आणि ग्रामसभेस अधिकार :

ग्रामसभा ही सार्वभौम आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीत लोकांचा सहभाग हा महत्त्वाचा मुद्दा असून ग्रामसभेची भूमिका अनन्य साधारण महत्त्वाची आहे. त्यासाठी अभियानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना ग्रामपंचायतीस माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे.

गावाच्या पाण्याचा ताळेबंद तयार करणे ही अभियानातील महत्त्वाची बाब आहे. हा ताळेबंद तयार केल्यानंतर गावातील लोकांनी सुचविल्यानुसार कामांचा अंतर्भाव गावाच्या कृती आराखड्यात तयार करुन मग या कामांना ग्रामसभेची मान्यता घेतली जाईल. या कृती आरखड्यानुसार निश्चित करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात सुरु करण्यापूर्वी या कामांची माहिती ग्रामपंचायतींना देण्यात येईल.

पूर्ण झालेल्या कामाचे अंतिम देयक संबंधितांना अदा करतानाही अंमलबजावणी यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी कामाची तपशीलवार माहिती ग्रामसभेला देणे आवश्यक आहे. कामासंदर्भात ग्रामस्थांची कोणतीही तक्रार असल्यास अंतिम देयक अदा न करता, तक्रारीची शहानिशा करुन, कामाची गुणवत्ता तपासून मगच कामाचे अंतिम देयक अदा करण्यात येईल.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील तरतुदीनुसार जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत गावात होत असलेल्या कामांची माहितीही प्रत्येक सहा महिन्यातून एकदा ग्रामसभेला देणे आवश्यक आहे.

## तांत्रिक नियंत्रण :

कामांची गुणवत्ता उच्चतम राखण्यासाठी तांत्रिक परीक्षण वेळोवेळी होणे आवश्यक आहे. त्यासाठीही शासनाने तांत्रिक नियंत्रणासाठीचे प्रयोजन केले

आहे. 25 लाख रुपये किमतीच्या कामांच्या गटासाठी (उदा. साखळी सिमेंट नालाबांध, नाल्यातील गाळ काढणे, खोलीकरण करणे, गाव-साठवण तलाव इत्यादी) किमान एक अभियांत्रिकी पदवीकाधारक कर्मचारी कंत्राटी पद्धतीने असणे आवश्यक आहे.

तसे समूह संघटक व उपजिविका उपक्रम यापैकी एकाची नियुक्ती तसेच तांत्रिक ज्ञान असलेला कर्मचारी म्हणून कृषी पदवीधर, कनिष्ठ अभियंता या संवर्गातून नियुक्ती करावी जेणेकरुन कामाच्या तांत्रिक तपासणीसाठी उपयुक्त होऊ शकेल. जलयुक्त शिवार अभियान हे महाराष्ट्र शासनाचा उपक्रम दुष्काळ मुक्तीच्या शाश्वत उपाय योजनांसाठी आहे.

त्यादृष्टीने लोकांना भूगर्भातील पाण्याचे, आपापल्या परिसरातील पाण्याच्या स्त्रोतांचे, त्यांच्या शाश्वततेचे महत्त्व यातून पटविले जात आहे. ही केवळ लोकांना उपदेश करणारी कार्यपद्धती नव्हे तर प्रत्यक्ष लोकांना सहभागी करुन त्यांना अनुभवातून शहाणपण देणारी जल-चळवळ आहे.

## जलयुक्त शिवार अभियान आणि मंत्र्याची मते :

मा. ना. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य :

राज्य सरकारने सुरू केलेली जलयुक्त शिवार ही महत्वाकांक्षी योजना आहे. पाण्याचा पडणारा थेंब अन् थेंब अडवायचा, साठवायचा व त्याच ठिकाणी

मुरवायचा. पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्यासाठी पाण्याचे विकेंद्रित साठे त्या त्या गावात निर्माण करायचे आहेत. राज्यात सगळीकडेच या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. जलयुक्त शिवार ही खरोखर जनतेची योजना आहे. जनतेने आता मनावर घेतले आहे, त्याला केवळ पाठबळ देण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. गावपातळीवर जनतेचा चांगला पाठींबा मिळाल्याने जलयुक्त शिवार लोकचळवळ बनत आहे. या योजनेमुळे संपूर्ण राज्यात दुष्काळ कायमचा हटविण्यास मदत होणार आहे.

### मा. श्री. प्रदीप पुरंदरे, जलतज्ज्ञ :

जलयुक्त शिवार योजनेत आज पाणी मुरण्यापेक्षा पाणी दिसण्यावर जास्त भर आहे. जेसीबीच्या अमर्याद वापरामुळे प्रति घनमीटर खर्च वाढला आहे. पथ्ये न पाळता जेथे खोलीकरण होते आहे तेथे पर्यावरणाची हानी होत आहे. संस्थात्मक बाबींकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे झालेल्या कामांचे भविष्यात काय होणार हे ही स्पष्ट नाही. अमूक इतके टीएमसी पाणी अडवले असा जो दावा केला जात आहे त्याबद्दलचा शास्त्रीय अभ्यास शासनाने जाहीर केल्यावर मगच त्याबद्दल मतप्रदर्शन करणे उचित होईल. पण टीएमसी (थाऊजंड मिलियन क्युबिक फिट) आणि टीएमसी (थाऊजंड क्युबिक मीटर) या एककांच्या वापरात नामसाधर्म्यामुळे गल्लत तर झाली नाही ना, असा प्रश्न पडतो.

## मा. श्री. राजेंद्रसिंह राणा, जलतज्ज्ञ :

जलयुक्त शिवार अभियांनाच्या माध्यमातून दुष्काळी प्रदेश अधिक पावसाच्या प्रदेशात रूपांतरित करणे शक्य असून, ही योजना निराशेला आशेत बदलण्याचा कार्यक्रम आहे. जलसंरचनेवर अतिक्रमण, नद्यांचे प्रदूषण, भूजलाचा पुनर्भरणाऐवजी आधिक्याने वापर आणि पाण्याच्या कमतरतेमुळे होणारे विवाद या आजच्या प्रमुख समस्या असल्याचे त्यांनी नमूद केले. या समस्यांच्या निराकरणासाठी जलसंरक्षतेच्या माध्यमातून नदी प्रदूषण टाळणे आणि जलसंरचना ओळखून पाण्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. अशी जलक्रांती घडविण्याची प्रत्येकात क्षमता आहे.

## मा. श्री. सुरेश खानापूरकर (शिरपूर पॅटर्नचे जनक) :

राज्य सरकारतर्फे जलयुक्त शिवार योजना अंमलात आणण्याचा गाजावाजा केला जात असला, तरी ज्या पध्दतीने ही योजना राबवली जात आहे, त्यामुळे जलमुक्त योजना होते की काय ? लोकसहभाग घेवूनही सिंचन विभागाचे अधिकारी केवळ ३ फूट खोलच माती खोदण्याचे काम करीत असतली, तर या कामाचा कोणताही उपयोग नाही. किमान २० फूट खोल खोदल्याशिवाय पाणी अधिक मुरणार नाही. तीन वर्षे पाणीसाठा पुरेल इतके पाणी साठवले गेले पाहिजे. शिरपूर येथे असे काम आपण करून दाखवले.

तेथे कोणत्याही शेतकर्याला ५०० मीटर अंतरावर किमान १० तास मोटार चालेल इतके पाणी उपलब्ध आहे.

मा. श्री. पाशा पटेल - आमदार आणि शेतीप्रश्नाचे अभ्यासक :

सध्या मराठवाड्यात भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे. सततच्या नापिकी मुळे पाऊस पडत नसल्याने मराठवाडा मोठ्या संकटात सापडला आहे. या दुष्काळावर जलयुक्त शिवार हाच उपाय आहे. पण हे काम एकटे सरकार करू शकणार नाही. सरकारच्या लोकवाटा गोळा झाला की जनजागृती होते. हे काम आपले आहे याची समाजामध्ये जाणीव निर्माण होते. लोकांचा सहभाग वाढतो. भ्रष्टाचाराला आळा बसतो. जिथे लोकवाटा नाही तेथे अधिकारी, गुत्तेदार यांचे प्राबल्य राहते. कामे निकृष्ट दर्जाची होतात. ज्या गावात पक्षाचे राजकारण बाजूला ठेवून तेथील कार्यकर्ते एकत्र येतात, सारे गाव बांधतात तेथे काम होण्यास वेळ लागत नाही. जिथे लोक स्वत:हून पुढे येवून काम करतात तिथे भ्रष्टाचाराचा नायनाट झालेला आम्ही पाहिला आहे. कामाची गुणवत्ता वाढली आहे. मुख्य म्हणजे जो लोकवाटा जमा केलेला असतो, ह्या पैश्याचा कोणी चहा देखील पित नसतो, असा आमचा अनुभव आहे. जलयुक्त शिवारामध्येही हे काम अपेक्षित आहे. जिथे हे होते आहे, तिथे शिवार जलयुक्त झाल्याशिवाय राहणार नाही.

जलयुक्त शिवार अभियानावर वरील मंत्री व जलतज्ज्ञाने अनुकूल प्रतिकूल मते व्यक्त केली असली तरी हा एक उपक्रम म्हणून शासनाची योजना खूपच चांगली आहे. त्यात थेट जनतेचा सहभाग आहे. जागतिक राजकारणात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी निर्माण झालेल्या स्पर्धेतून ग्लोबल वार्मिंग निर्माण झाली आणि त्याचा विपरित परिणाम हवामानावर झाला. त्यावेळी निसर्गाच्या ऋतूचक्रात बदल होवून त्याचे रूपांतर दुष्काळ वाढण्यात झाले. यंदाचा दुष्काळ भारताच्या इतिहासात नोंद ठेवणारा असा ठरला. देशात जवळपास अर्ध्या राज्यात दुष्काळ पडला. महाराष्ट्रातील पाण्याचे दुर्भिक्ष (पाणीप्रश्न) भयंकर स्वरूपाचे आहे. त्यातल्या त्यात मराठवाड्याला तर दुष्काळाची भयंकर झळ बसली. येथील शेतकरी आत्महत्येचा विषय फारच गहन स्वरूपाचा बनला आहे. मराठवाड्याचे हक्काचे पाणी पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ पळवते हे आता पर्यंतच्या पाण्याच्या राजकारणाचा इतिहास आहे. मराठवाड्याच्या पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान पाण्याचे योग्य व्यवस्थापन व वापर उपयुक्त ठरणार याबाबत शंका घ्यायचे कारण नाही.

## मागेल त्याला शेततळे:

या उपक्रमाद्वारे ज्या शेतकऱ्याला आपल्या शेतात शेततळे हवे आहे त्याने ऑनलाईन अर्ज केल्यास शासनाकडून ५०,००० रुपये तळेबांधणीसाठी

मिळण्याची तरतूद केली गेली. ही प्रक्रिया फार महत्वाची ठरते कारण यातून लोकसहभाग वाढेल तसेच शेततळे जितके अधिक बनतील तितकी पाणीसाठवणूक वाढेल. अशी युक्ती लढवून फडणवीस सरकारने बाजी मारली आहे म्हटल्यास ती अतिशयोक्ती न ठरावी. महत्वाचे म्हणजे लोकसहभागातून ही सारे कामे पार पडत आहेत. जल संधारणासाठी जास्तीत जास्त लोकसहभाग वाढावा म्हणून शासन कार्यरत आहे. आणि लोकांचाही उत्फुर्त प्रतिसाद मिळतोय याचा पुरावा म्हणजे 'मागेल त्याला तळे' साठी १.२५ लाख अर्ज आले आहेत. शासनाची नियोजनबद्ध योजना आणि तितक्याच किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्वाचा लोकसहभाग एकत्र आल्यास काय घडते याचं उत्तम उदाहरण म्हणजे ही जलयुक्त शिवार योजना.

## प्रामाणिक प्रयत्न :

केवळ घोषणा करून कुठलाही प्रकल्प मार्गी लागत नाही तर त्याची योग्य अंमलबजावणी करावी लागते याची कल्पना मुख्यमंत्र्यांना असावी म्हणून त्यांनी १ सप्टेंबर पासून एमआरसॉक प्रणाली बसवण्याचीही व्यवस्था केली. ही प्रणाली पूर्णपणे जी.पी.एस. टॅगिंग असेल. यामुळे ज्या ठिकाणचे काम आहे तेच छायाचित्र अपलोड करता येईल, इतर ठिकाणचे छायाचित्र त्यात स्वीकारले जाणार नाही. यामुळे कामातील पारदर्शकता जपली जाईल. शिवाय फडणवीस दर आठवड्याला

सुरु असलेल्या कामाचा आढावा घेतात. यावरून मुख्यमंत्र्यांना दुष्काळापासून मुक्तीसाठी खरंच प्रामाणिक प्रयत्न करायचाय हे तरी सिद्ध होते.

## कामगिरीचा आढावा :

- पुणे जिल्ह्यात हा उपक्रम राबवण्यासाठी २०० गावांची निवड केली गेली होती. त्यापैकी १८७ गावे (९०%) ही ऑगस्ट महिन्यापर्यंतच जलयुक्त झाली आहेत. तसेच पुण्याची भूगर्भातील पातळी २ मीटरपर्यंत वाढली आणि जिल्ह्यातील ४० हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले.
- सोलापूर जिल्ह्यात मागील दोन वर्षांत झालेल्या कामांमुळे ४ टीएमसी पाण्याची साठवण झाली आहे ज्यामुळे सोलापुरात दुष्काळाचे सावट दूर झाले आहे. या दोन वर्षांत जिल्ह्यातील जवळपास ५०० गावे जलयुक्त झाली आहेत आणि भूगर्भात १ ते ४ मीटर पर्यंत पाणीपातळी वाढली आहे.
- नागपूरमध्ये झालेल्या कामांमुळे बंधारे, नाले, तलाव यांमध्ये पाण्याचा संचय झाल्याने बरीचशी सिंचनक्षमता निर्माण झाली आहे, ज्याचा शेतकऱ्यांना निश्चित फायदा होईल. एका कृषी विभागाच्या अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार नागपुरात पिकांच्या लागवड क्षेत्रात ५० ते ६० हजार हेक्टरने वाढ झाली आहे.

- सातारा जिल्ह्यात अर्धा ते ३ मीटर, सांगली जिल्ह्यात अर्धा ते एक मीटर, कोल्हापूर मध्ये १ ते ४ मीटर पाण्याची पातळी वाढली आहे.
- योजनेची घोषणा करताना फडणवीसांनी २५ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचे आश्वासन दिले होते ज्यापैकी अद्याप १५ लाख हेक्टर जमीन ही ओलिताखाली येण्यास मुख्यमंत्र्यांना यश आले आहे.
- मागील ४ महिन्यांत राज्यात ७५,००० शेततळयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

## जलयुक्त शिवार अभियानाचे यश :

- **शेततळी-बंधारे भरले:**

पावसाने ओढ दिल्याने होरपळणाऱ्या महाराष्ट्राला गेल्या काही दिवसांपासून झालेल्या पावसाने मोठा दिलासा दिला आहे. महाराष्ट्राचे भविष्य बदलण्याची ताकद असलेल्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या मोठ्या प्रमाणावरील कामांमुळे शेततळी, बंधारे भरण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे बळीराजा सुखावला असून जलाशयांमुळे भूजल पातळी वाढण्यात मदत होणार आहे. भविष्यातील पाणी व चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास यामुळे निश्चितच मदत होणार आहे. "मराठवाड्यावर पावसाने कृपा केल्याने मी निसर्गाचे आभार मानतो. असाच दिलासा संपूर्ण राज्याला

मिळू दे अशी प्रार्थना करतो. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत बांधलेली शेततळी आणि बंधारे पावसाच्या पाण्याने भरले. ही समाधानाची बाब आहे. ही योजना शाश्वत सिंचनाचा मार्ग निश्चितपणे प्रशस्त करेल", असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले आहे.

लातूर जिल्ह्यात अगदी काही दिवस पुरेल एवढाच पाणी साठा राहिला होता. मांजरा धरणात केवळ 1.3 दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) पाणी उरले होते. या पावसामुळे ते 3 द.ल.घ.मी. झाले आहे. निम्न तेरणा धरणातून निलंगा शहराला पाणी पुरवठा होतो. तिथे 2 द.ल.घ.मी. पर्यंत पाणी उरले हाते. या पावसामुळे ते 5 द.ल.घ.मी. एवढे झाले आहे. आता शहराला तीन महिने पाणी पुरेल एवढा साठा उपलब्ध झाला आहे. येत्या काही दिवसात असाच पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जेथे कामे झाली आहेत, तेथे पाण्याचा साठा दिसू लागला आहे. पावसाने ओढ दिल्याने पेरण्या उशिरा झाल्या होत्या. हा पाऊस रब्बी पिकांसाठीही उपयुक्त ठरेल असे आशादायी चित्र निर्माण झाले आहे.

परभणी जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात सरासरी 50 मि.मी. पाऊस पडला. जलयुक्त शिवार अंतर्गत तयार झालेल्या साठवणूक नाला, बंधारे यात पाणी साठले आहे. या जिल्ह्यात जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात

झालेली असल्यामुळे पावसाचे पाणी जास्त जिरले आहे. कापूस, सोयाबीन तसेच रब्बीतील पिकाला या पावसाचा फायदा होणार आहे. जायगाव, भारसवाडा, झरी, कौडगाव ता. गंगाखेड, चारठाणा या गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता राहणार नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यात तीन दिवस सतत चांगला पाऊस पडला असल्याने सरासरी 36 मि.मी. एवढी पावसाची नोंद झाली आहे. कळंब, खर्डा या गावांना टँकरने पाणी देण्याबाबतची मागणी होती. मात्र आता त्याची आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून जलयुक्त शिवारातील पाणी साठ्यांमध्येही वाढ झाली आहे. बीडमधील लघु व मध्यम प्रकल्पातील धरणांमध्ये समाधानकारक पाऊस पडल्याने पाणी साठू लागले आहे. टँकरची संख्या कमी झाली आहे. पाटोदा, गेवराई येथील टँकर बंद करण्यात आले आहेत. या जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत 4 हजार कामे हाती घेण्यात आली असून पाणी साठ्यात वाढ झाली आहे.

नांदेड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी झाली आहे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत पाण्याची पातळी वाढली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील खांबेगाव, आंबेसावंगी या जिल्ह्यांना भेट दिली असता त्यावेळी येथील पाणीसाठे

कोरडे होते. आता गावातही पाणीसाठा पुरेशा प्रमाणात झाला आहे. विहिरी, नाला यात पाणी भरु लागले आहे. चारा टंचाई जाणवणार नाही असे चित्र निर्माण झाले आहे. येथे जलयुक्त शिवार योजने अंतर्गत 3 हजार 121 कामे पुर्ण झाली असून 457 कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय यापुर्वीच 1 हजार विहिरींच्या पुनर्भरणाचे कामही झाले आहे.

हिंगोली जिल्ह्यात सरासरी 46 टक्के पाऊस पडल्याने पुरेसा पाणीसाठा निर्माण झाला आहे. पुढचे 10 दिवस असाच पाऊस पडत राहिल्यास जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण होऊन रब्बी पिकास त्याचा फायदा मिळणार आहे. जलयुक्त शिवार योजनेंतर्गत 33 सिमेंट नाला बांधणीचे काम झाले असून समाधानकारक पाणी साठा दिसून येत आहे.

- चाळीसगाव तालुक्यातील 24 गावे टंचाईमुक्त

महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत महत्वकांक्षी असणाऱ्या जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत चाळीसगांव तालुक्यात प्रथम टप्प्यात एकूण 24 गावांची निवड करण्यात आलेली होती. महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत महत्वकांक्षी असणाऱ्या जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत चाळीसगांव तालुक्यात प्रथम टप्प्यात एकूण 24 गावांची निवड करण्यात आलेली होती. त्यानुसार गावाच्या गरजेनुसार पाण्याचा ताळेबंदावर आधारीत आराखडा तयार करुन

चाळीसगांव तालुक्यात एकुण 940 कामे ही विविध तालुकास्तरीय यंत्रणांमार्फत आराखड्यात घेऊन एकूण 767 कामे ही पूर्ण करण्यात आलेली आहेत.

या कामांसाठी एकूण 13.24 कोटी रुपयाची कामे प्रस्तावीत करण्यात आलेली होती, तथापि विविध निधीच्या माध्यमातून जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात 11.22 कोटी इतक्या रकमेची कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या गावामध्ये 1228 टीसीएम एवढा पाणीसाठा झाला असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी आर.एस.राजपूत यांनी दिली. कृषी विभाग, ग्राम पंचायत यंत्रणा, लघु सिंचन विभाग, वन विभाग, स्थानिक स्तर इत्यादी विभागांनी विविध कामांच्या माध्यमातून निवडलेल्या 24 गावात गावाच्या गरजेपेक्षा जास्त पाणी साठा निर्माण होईल अशी कामे करुन गाव पुर्णत: टंचाई मुक्त झालेली असून त्यामुळे सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध झाले आहे. हे अभियान यशस्वी होण्यासाठी विविध विभागा कडील योजना,अशासकीय संस्था व लोकसहभाग यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. समन्वयाने राबविण्यात आलेल्या ह्या अभियानाचा हा पहिला टप्पा यशस्वी झाल्याचे चित्र या गावामध्ये भेट दिल्यास नक्कीच निदर्शनात येते.

## साडेबारा लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण :

टंचाईसदृश्य परिस्थितीला सक्षमपणे तोंड देण्याबरोबरच राज्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ चे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी राबविण्यात येत असलेल्या "जलयुक्त शिवार अभियानाची" ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात:

- दोन वर्षात ११ हजार ४९४ गावांची निवड
- २ लाख ७९ हजार १७२ कामे पूर्ण, ३ लाख १२ हजार १६५ कामे सुरु
- दोन वर्षात ३४०० कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध
- ४७८६ गावांमधील कामे १०० टक्के पूर्ण
- ११ लाख ८२ हजार २२९.४८ टी.सी.एम. निर्मित पाणीसाठा
- १४७२.७७ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला
- ३४५५.५४ किलोमीटर लांबीच्या कामाचे खोलीकरण आणि रुंदीकरण
- विशेष निधी आणि कन्हरजन्स मधून ३ हजार ९४६.१४ कोटी रुपयांचा निधी खर्च
- ११ लाख ८२ हजार २२९ टी.सी.एम. पाणीसाठी निर्माण
- १२ लाख ५१ हजार ७१३ हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचनाची क्षमता निर्माण
- ४ हजार ७८६ गावांमधील कामे पूर्ण झाली आहे.
- दरवर्षी 5 हजार याप्रमाणे पाच वर्षांत राज्यातील २५ हजार गावांमध्ये अभियान राबविणार

- सन २०१५-१६ मध्ये या अभियानातंर्गत ६२०२ गावांची निवड
- या गांवामध्ये जलसंधारणाची २ लाख ४४ हजार ७२२ कामे करण्यात आली
- त्यापैकी २ लाख ३४ हजार ९ कामे पूर्ण
- तर १० हजार ७१३ कामे प्रगतीपथावर
- गाळ काढण्याची ९ हजार ५७८ कामे पूर्ण
- ४८०.४१ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला
- १७४९.७९ कि.मी. लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण
- कामांची किंमत ३१३.२५ कोटी रुपये
- लोक सहभागातून गाळ काढण्याची 6 हजार १८१ कामे पूर्ण
- या कामांच्या माध्यमातून ५६३.८५ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला
- तर ११४९.११ कि.मी. लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण
- या कामांची किंमत ४००.६५ कोटी रुपये आहे.
- अभियानासाठी पहिल्यावर्षी २ हजार कोटी रुपयांचा विशेष निधीची तरतूद
- त्यापैकी आतापर्यंत १५७२.५१ कोटींचा निधी खर्च
- अभियानात ८ हजार २७३ साखळी/सिमेंट नाला बांधच्या कामांचा समावेश
- यापैकी ६ हजार १३७ कामे पूर्ण
- या कामांवर आतापर्यंत ६७७.५३ कोटी रुपयांचा निधी खर्च
- तसेच ६९ हजार ४६८ इतर कामांचा समावेश

- त्यापैकी ५६ हजार ५२८ कामे पूर्ण
- या कामांवर आतापर्यंत ८९४.९८ कोटी रुपयांचा निधी खर्च
- निवड झालेल्या गावांपैकी ४ हजार ७२८ गावांमधील कामे १०० टक्के पूर्ण झाली
- तर ७८८ गावामधील कामे ८० टक्के पूर्ण
- चालूवर्षी हे अभियान ५ हजार २९२ गावांमध्ये राबविण्याचे निश्चित यावर्षी निवडण्यात आलेल्या गावांमध्ये कोकण विभागातील १३६, नाशिक विभागातील ९००, अमरावती विभागातील ९९८, पुणे विभागातील ८२५, औरंगाबाद विभागातील १५१८ तर नागपूर विभागातील ९१५ गावांचा समावेश
- या गावांतील जलसंधारणाची एकूण ६७ हजार ४३३ नियोजित
- त्यापैकी ४५ हजार १६३ कामे पूर्ण
- तर २२ हजार २८० कामे प्रगतीपथावर
- गाळ काढण्याची २ हजार २१५ कामे पूर्ण
- या कामांच्या माध्यमातून १६३.०७ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला
- तर ९६७.३३ कि.मी. लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण
- या कामांची किंमत ८६.१७ कोटी रुपये
- तसेच लोक सहभागातून गाळ काढण्याची २ हजार ८० कामे पूर्ण
- या कामांच्या माध्यमातून २६५.४४ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला
- तसेच ५८९.३१ कि.मी. लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण

- या कामांची किंमत १४०.७६ कोटी रुपये
- अभियानासाठी यावर्षी १४०० कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात आला
- अभियानात यावर्षी ३ हजार ८९० साखळी/सिमेंट नाला बांधच्या कामांचा समावेश
- तर ३२ हजार ९१७ इतर कामांचा समावेश, त्यापैकी ८ हजार ५७८ कामे पूर्ण
- दोन वर्षांत ३ हजार ९४६.१४ कोटी रुपयांचा निधी खर्च
- राज्यात सुमारे ११ लाख ८२ हजार २२९.४८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्मीत झाला आहे.
- राज्यातील १२ लाख ५१ हजार ७१३.४ हेक्टर क्षेत्रास एका संरक्षित सिंचनाची
- तर ६ लाख २८ हजार ५१२.९२ हेक्टर क्षेत्रास दोन संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध

## मूल्यमापन :

जलयुक्त शिवार योजनेसाठी महाराष्ट्रात लोकवर्गणी, श्रमदान आदी माध्यमातून लोकांचा चांगला सहभाग लाभला आहे. सरकार आणि लोकांच्या सहभागाचे 'जलयुक्त शिवार'अभियान हे एक आदर्श मॉडेल आहे. कोणतीही योजना ही लोकांच्या सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. महाराष्ट्रातील

srujanaacademics

भौगोलिक विविधता पाहता जलसंधारणाची कामे करत असताना त्याला स्थानिक परिस्थितीनुरूप स्वरूप देणे गरजेचे आहे. जलयुक्त शिवार अभियान राबविताना "माथा ते पायथा' या धोरणानुसार जलसंधारणाची कामे करण्यात यावीत. याशिवाय नदी खोऱ्याला केंद्रिभूत मानून जलसंधारणाची कामे करण्यात यावीत. राज्य सरकारने हाती घेतलेला नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमही आदर्श असून, तो प्रभावीपणे राबविण्यात यावा, असे आवाहन त्यांनी केले. जलयुक्त शिवार आणि नदी पुनरुज्जीवन अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पाणीप्रश्नावर सकारात्मक तोडगा निघू शकेल.

जलयुक्त शिवार अभियानात करण्यात आलेल्या कामांसाठी या दोन वर्षांत विशेष निधी आणि कन्व्हेजन्स मधून ३ हजार ९४६.१४ कोटी रुपयांचा निधीखर्च झाला आहे. यामध्ये प्रत्यक्ष नागरिकांनी केलेली मदत, देवस्थान मंडळे, सामाजिक संस्था आणि कंपन्यांच्या मदतीचा ही समावेश आहे. या कामांमुळे राज्यात सुमारे ११ लाख ८२ हजार २२९.४८ टी.सी.एम. पाणीसाठा निर्मीत झाला आहे. या पाणीसाठ्याच्या माध्यमातून राज्यातील १२ लाख ५१ हजार ७१३.४ हेक्टर क्षेत्रास एका संरक्षित सिंचनाची तर ६ लाख २८ हजार ५१२.९२ हेक्टर क्षेत्रास दोन संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. यावरुन जलयुक्त शिवार अभियान हे आता अभियान न राहता लोकचळवळ झाल्याचे दिसून येते.

जलयुक्त शिवार अभियान















जलयुक्त शिवार